अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# राज्यात जागा वाटपात दोन्ही काँग्रेसची आघाडी

लोकसभा निवडणुकीच्या रणधुमाळीपूर्वी राज्यात काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांनी आघाडी घेतलेली दिसते. २२ आणि २४ असे लोकसभा मतदार संघांचे जागा वाटप करून हे दोन्ही पक्ष खऱ्या अर्थाने निवडणुकीच्या तयारीला लागलेले आहेत.२४ जागा काँग्रेसला आणि २२ जागा राष्ट्रवादी काँग्रेसला असा समझोता करून रणनिती नक्की केली गेली आहे त्या तुलनेत विरोधी पक्षाच्या तंबूमध्ये अजून बरीच शांतता दिसते. प्रामुख्याने दोन्ही काँग्रेसला तगडे आव्हान देण्याचे काम सेना-भाजपा,रिपब्लिकन पक्ष-स्वाभिमानी शेतकरी संघटना यांच्या महायुतीने निर्माण केले आहे. या चार पक्षामध्ये जागा वाटप करायचे म्हणजे बरेच रुसवेफुगवे होण्याची शक्यता आहे रिलब्लिकन पक्ष आणि स्वाभिमानी शेतकरी संघटना यांना त्यांच्या अपेक्षेप्रमाणे जागा सोडाव्या लागतील आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे या दोन्ही पक्षातील बरेच नेते निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक आहेत. आपल्या वाट्याला येणारी जागा जर अन्य पक्षांना दिली गेली तर सेना-भाजपामध्येसुध्दा नाराजी निर्माण होऊ शकते ती वाढू नये म्हणूनच महायुतीने जागा वाटपाची घाई केलेली दिसत नाही. कारण कोणत्याही निमित्ताने बंडखोरी होऊ शकते त्याचा गैरफायदा काँग्रेसला मिळू द्यायचा नाही, असा प्रयत्न महायुतीचे नेते करीत असावेत. जागांची संख्या ४६ असल्यामुळे अनेक इच्छुकांची समजूत घालावी लागेल. त्यामध्ये महायुतीच्या नेत्यांची बरीच शक्ती आणि वेळ खर्ची पडणार आहे. दोन्ही काँग्रेसचे जागा वाटप फारसे किचकट नव्हते. दोघांमध्येच जागांची संख्या नक्की करायची असल्यामुळे फारसा वाद होण्याची शक्यता नव्हती मात्र राष्ट्रवादी काँग्रेसला समान जागा वाटप करायचे होते ते झालेले नाही. तसेच काँग्रेसकडे असलेले दोन मतदार संघ आपल्याला मिळावे हा राष्ट्रवादी काँग्रेसचा प्रयत्नही यशस्वी झालेला दिसत नाही.

## बंडखोरी टाळण्यासाठी

या दोन्ही काँग्रेसने निवडणुकीची घोषणा होण्यापूर्वी तब्बल १५ दिवस आधी जागा वाटप नक्की करून घेतले. यामागे देखील शरद पवारांची मोठी राजकीय खेळी आहे हेही लपून राहत नाही तसे पाहिले तर गेल्या वर्षभरापासून शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेसला जादा जागा लढविता याव्यात म्हणून काँग्रेसला पटविण्याचा प्रयत्न करीत होते. अगदी ठरवून त्यांनी यावेळेच्या लोकसभा निवडणुकीची समीकरणे नक्की केली आहेत. निदान राज्यामध्ये कमी जागा लढवून काँग्रेसच्या बरोबरीने जागा जिंकण्याचा शरद पवारांचा हेतू आहे. म्हणूनच त्यांनी या सगळ्याच लोकसभा निवडणुकीची रणनीती ठरविताना सगळ्याच बाबींचा विचार केलेला दिसतो. मतदार संघ नक्की करणे १०० टक्के जिंकणाऱ्या उमेदवारांना तयार करणे त्यातही त्यांनी राज्यात सलग तीन वेळा मंत्रीपदे भूषविली आहेत. अशांना लोकसभेच्या मैदानात उतरविणे असे काही आडाखे तयार करून राष्ट्रवादी काँग्रेसचे कमीतकमी नुकसान होईल याची काळजी घेतलेली आहे. आता देखील सर्वांच्या आधी जागांची संख्या नक्की करण्यामागे देखील त्यांचे वेगळेच डावपेच आहेत. एक तर महायुतीमध्ये जागांच्या संख्येवरून आधीपासूनच वाद निर्माण करायचा. दुसरे म्हणजे आपल्या पक्षातल्या कार्यकर्त्यांमध्ये असलेल्या मतभेदांचा अंदाज घ्यायचा. कोणीही बंडखोरी करणार नाही याची दक्षता घ्यायची ज्यांना निवडणूक लढविण्याचे आदेश दिले जातील परंतु त्यांची निवडणूक लढविण्याची इच्छा नसेल तर त्यांचा स्वतंत्र विचार करायचा. अशा सगळया मुद्द्यांचा अंदाज घेण्याकरिता त्यांनी ही जागांची संख्या घाईने नक्की केलेली आहे. तीच परिस्थिती काँग्रेसमध्ये आहे कारण यावेळेला भारतीय जनता पार्टीचे आव्हान समोर असले तरी महाराष्ट्रात निवडणूक लढविण्यासाठी अनेक जुनेजाणते लोक इच्छुक आहेत. त्यांच्यातील स्पर्धा आणि नाराजी लक्षात येण्याकरिता या जागावाटपाच्या संख्येचा निश्चितच उपयोग होईल नाराजीवरचा उपाय शोधण्याकरिता ही युक्ती वापरली गेलेली दिसते.

## अजून वातावरणाचा अंदाज नाही

खरे तर अजूनही लोकसभा निवडणुकीचे वारे नेमक्या कोणत्या दिशेने वाहत आहेत हे समजत नाही. नरेंद्र मोदी यांच्या नावाची लाट निर्माण करण्याचा प्रयत्न भारतीय जनता पार्टी करीत आहे. गेल्या पाच वर्षांतली प्रचंड महागाई भ्रष्टाचाराची अनेक प्रकरणे याविरोधात लोकांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. त्याचा फायदा विरोधी पक्ष कसे घेतात यावर बरेच काही अवलंबून राहिल. केवळ नरेंद्र मोदींना पुढे करून भरपूर जागा जिंकता येतील असे समजण्याचे कारण नाही विशेषत: महाराष्ट्रासारख्या काँग्रेसच्या बालेकिल्ल्याला भगदाड पाडणे वाटते तितके सोपे नाही. परंपरेने काँग्रेसला मते देणारे मतदार महाराष्ट्रात मोठया संख्येने आहेत. गेल्या १० वर्षांपासून सत्तेत असलेल्या दोन्ही काँग्रेसने आपापले मतदारसंघ मजबूत केलेले आहेत.

सत्तेचा योग्य उपयोग करून जास्तीतजास्त जागा मिळविण्याचे तंत्र या दोन्ही काँग्रेसला चांगले माहीत आहे. अगदी मतदानाच्या चार दिवस आधी दोन्ही काँग्रेस असा काही प्रचाराचा धडाका लावते की शेवटच्या क्षणी पारडे फिरते. आपल्याबाजूने लोक आहेत, असे सेना भाजपाला वाटत असतानाच मतदानात मात्र वेगळेच परिणाम दिसून येतात म्हणूनच मोदी यांच्या बाजूने किंवा देशात काँग्रेसच्या विरोधात लाट आहे, असे निष्कर्ष काढण्याची गरज नाही. प्रामुख्याने महाराष्ट्रात निवडणुकीत कसे जिंकून यायचे, हे काँग्रेसवाल्यांना चांगले जमते हा सगळा वर्षानुवर्ष चालणारा परिपाठ लक्षात घेऊनच दोन्ही काँग्रेसने किती जागा लढवायच्या हे नक्की करून घेतले आता त्यातल्या किती जिंकून आणायच्या यासाठी ते सगळी शक्ती पणाला लावू शकतात.आतापर्यंत काँग्रेसने निवडणुका लढवताना याच गोष्टींची काळजी घेतली. आपल्या विरोधकांनी कसाही प्रचार केला तरी शेवटच्या क्षणी प्रचाराचे आगळे आणि वेगळे तंत्र वापरून जिंकण्याची शक्यता वाढवायची. त्यात काँग्रेसला यश मिळत असते. महाराष्ट्रात तरी मोदी लाटेचा काँग्रेसने फारसा धसका घेतलेला दिसत नाही. कारण त्यांना त्यांच्या बालेकिल्ल्यांची पूर्णपणे खात्री वाटते. विशेषत: पश्चिम महाराष्ट्र-मराठवाडा या टापूमध्ये काँग्रेसचे परंपरागत मतदारसंघ आहेत. आता अन्य भागातही मुसंडी मारण्याचा काँग्रेसचा विचार दिसतो.